(१)

दूरध्वनी : २८४ १५ ७६/२०२ ६२ ४९ फॅक्स : २०२९३४८
ग्राम : पाणी मंडळ,

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

**क्र.मजीप्रा/सस/सभा ९०/२००१/आ-४** **दि : २९ मार्च, २००१**

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९० व्या सभेचे इतिवृत्त

दि.२९ मार्च,२००१ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९० वी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त आपल्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

कृपया, सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

**(सुरेश साळवी)**
**सदस्य सचिव**

**मा.मंत्री, ग्राम विकास, पा.पु.व स्व.**
**तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष**

M J P
Mumbai-21.
Date 7/4/01
Received

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९१ व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९१ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा. ना.श्री. आर.आर. पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१ जून,२००१ रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री,ग्रामविकास,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे,मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३. श्री.सुनिल तटकरे,राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
४. श्री.रत्नाकर गायकवाड, सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
५. श्री.हुसेन,सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
६. श्री.विनोद कुलकर्णी,उप सचिव,(सचिव,वित्त विभाग यांचे प्रतिनिधी )वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
७. श्री.नि.ना.बालिंगे,उप सचिव,(सचिव,ग्रामविकास व जलसंधारण यांचे प्रतिनिधी),मंत्रालय,मुंबई
८. श्री.सुरेश साळवी,सदस्य सचिव,म.जी.प्रा.,मुंबई

या व्यतिरिक्त खालील निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
२. श्री.अ.बा.सावंत ,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३. श्री.शेखर गायकवाड,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
४. श्री.जी.सी.शर्मा,अ.अ.,म.नि.सं.व सं.कक्ष,म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९० व्या सभेचे प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९० व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९० व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कार्यवाही.**

कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तथापि, पळसगांव व रोहा पाणी पुरवठा योजनांना अधिक गती देवून कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची आवश्यकता मा.राज्यमंत्री,नगर विकास,यांनी विशद केली .त्याची नोंद घेण्यात आली.

हुडको प्रशासनाकडून ज्या २९ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे त्या योजनांची कामे प्राधान्याने मार्गी लागावीत. तसेच प्राप्त झालेला निधी त्या योजनांवर सत्वर खर्ची पडावा या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या. याबाबतचा आढावा घेवून काही अडचणी असल्यास दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

आयुर्विमा महामंडळाकडून सन २००१ या वर्षात मंजूर करण्यात आलेले आयुर्विमा कर्ज प्रत्यक्षात उपलब्ध न झाल्याची नोंद घेण्यात आली. सदर कर्ज प्राप्तीसाठी अध्यक्ष महोदयांनी आयुर्विमा महामंडळाकडे संपर्क साधून कर्ज उपलब्ध करुन दयावे अशी विनंती केली असल्याचे सांगण्यात आले. या अनुषंगाने पाठपुरावा करुन सदर कर्ज

प्राप्त करुन घ्यावे अशा सूचना मंत्री महोदयांनी दिल्या व याबाबतची कार्यवाही सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्तरावर करण्याचे ठरले.

प्राधिकरणाकडून पाण्याच्या दरामध्ये करण्यात आलेली वाढ याची नोंद घेण्यात येवून माथेरान शहराच्या पाणी पुरवठयामध्ये पुनर्विचार करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

काही पाणी पुरवठा योजना खाजगीकरण तत्वावर राबविता येतील का या अनुषंगाने चर्चा करण्यात येवून प्रायोगिक तत्वावर एखादी योजना राबविण्याबाबत विचार व्हावा या मा.अध्यक्ष महोदयांच्या सूचनेची नोंद घेण्यात आली.

ज्या स्थानिक स्वराज्य संस्था १०% लोकवर्गणी भरण्यास तयार आहेत त्यांची कामे हाती घेण्याबाबत चर्चा करण्यात आली असता, फक्त १०% निधी प्राप्त होईल या कारणास्तव कामे हाती घेणे संयुक्तिक ठरणार नाही. किंबहुना गरजेवर आधारित पाणी पुरवठा योजना राबविण्याचे जे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे तेच यापुढेही चालू रहावे ही बाब स्विकारण्यात आली.

नगरपरिषदांकडे असणाऱ्या थकबाकीच्या वसुलीचे उद्दिष्ट ठरविण्यात यावे व थकबाकी वसुलीबाबत सर्व स्तरावरुन नेटाने प्रयत्न व्हावेत असे ठरले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.३:- पुलगांव पाणी पुरवठा योजना,बी.ई.सी.खत कारखान्यास पाणी देण्याबाबत.</u>**

बी.ई.सी.खत कारखान्यास पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर काय असावेत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्तावित रु.३.६० प्रती १००० लिटर्स हा दर मान्य करण्यात येवून प्रत्येक वर्षी यामध्ये १०% वाढ करण्याचा प्रस्तावही मान्य करण्यात आला. कार्यक्रम बाबीमधील अटी/शर्ती पूर्णत: व्हाव्यात.

**<u>कार्यक्रम बाब क्र.४:-पाणी पुरवठा योजनेसाठी वीज जोडणीचे काम प्राधिकरणाने करण्याबाबत.</u>**

पाणी पुरवठा योजनांसाठी विद्युत जोडणीची कामे प्राधिकरणाने करणे योग्य राहील का याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून असे ठरविण्यात आले की, या प्रकरणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांशी पुन्हा: चर्चा करावी व येत्या दोन-तीन महिन्यांमध्ये अंतीमत: कोणता मार्ग स्विकारावा याबाबतचे धोरण ठरविण्यात यावे .

**<u>कार्यक्रम बाब क्र.५:-मोठ्या स्वरुपाच्या नळ पाणी पुरवठा योजनांची गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून पहाणी करण्यासाठी त्रयस्थ यंत्रणा नेमणेबाबत.</u>**

प्रत्येक प्रादेशिक विभागातील ३ मोठया किंमतीच्या योजनांची प्रायोगिक तत्वावर गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून पहाणी करण्यासाठी त्रयस्थ यंत्रणेची नेमणूक करण्याचे ठरले. या ३ योजनांची नांवे अध्यक्ष महोदयांशी चर्चा करुन निश्चित करावीत व पुढील कार्यवाही व्हावी असे ठरविण्यात आले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.६:-अहमदनगर वाढीव पाणी पुरवठा योजना,टप्पा-३,भाग-१, प्रक्रियापूर्व व प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या उपसा यंत्रणेच्या कामांना भाववाढ मिळणेबाबत</u>**

या प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात येवून प्राप्त प्रस्ताव हा संयुक्तिक असल्याने तो मान्य करण्यात आला. अदायगी करण्यापूर्वी सदर योजनेच्या निधीचा स्त्रोत पडताळणी करुनच अदायगी होईल.

वच्छता

च्या

**कार्यक्रम बाब क्र.७:-निलंगा पाणी पुरवठा योजना**
**निविदा क्र.बी-१/३८,सन१९९२-९३ अंतर्गत कामासाठी भाववाढीची अट शिथिल करणे.**

या प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात येवून प्राप्त प्रस्ताव हा संयुक्तिक असल्याने तो मान्य करण्यात आला. अदायगी करण्यापूर्वी सदर योजनेच्या निधीचा स्त्रोत पडताळणी करुनच अदायगी व्हावी.

**कार्यक्रम बाब क्र.८:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविधी १९८९ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

प्रस्तावित कार्यक्रम बाबींमध्ये ज्या बाबींचे दर वाढविण्याचे प्रस्तावित आहे त्या बाबी व वाढविण्यात येणारे दर याबाबतचा प्रस्ताव अध्यक्ष महोदयांना सादर करुन त्यास त्यांची मान्यता घ्यावी व तो प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावा असा निर्णय घेण्यात आला. कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.९:- अ)लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली खटला दाखल करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत(वर्ग-१ अधिकाऱ्यांबाबत) अनुसमथानार्थ.**

या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्ताव प्रशासकीय दृष्टया सोयीचा व नियमानुसार असल्याने प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**ब)लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली खटला दाखल करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत(वर्ग-२,३ व ४ कर्मचाऱ्यांबाबत)**

या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्ताव प्रशासकीय दृष्टया सोयीचा व नियमानुसार असल्याने प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१०:-अ)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय नियम १९८० (वैद्यकीय लाभ) मधील नियम ४,२(ई) (दोन) मध्ये सुधारणा करणेबाबत.**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्ताव मान्य करण्यात आला.

**ब) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय नियम १९८० (वैद्यकीय लाभ) मधील नियम १ अ, ब व नियम ६ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

या प्रकरणी साधकबाधक चर्चा करण्यात आली व शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाकडून मिळणारे भत्ते/सोई, सवलती व प्राधिकरणाकडून प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी देण्यात येत असलेले वित्तीय लाभ जर सारखा असेल तर हा प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसावी असा मुद्या मा.अध्यक्ष महोदयांनी उपस्थित केला. तथापि, शासकीय कर्मचारी व प्राधिकरणाचे कर्मचारी यांच्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यप्रणालीमध्ये काही प्रकरणी तफावत असल्यामुळे ही तफावत प्रथम दूर करणे आवश्यक असून त्यानंतरच या प्रकरणी निर्णय घेणे योग्य ठरेल असे मा.मंत्री महोदयांनी सूचित केले. तशा आशयाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे ठरले. तूर्त प्रस्तुत लाभ सुरु ठेवावा.

**कार्यक्रम बाब क्र.११:-नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक मंजूरी देणेबाबत.**

या प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात येवून सध्या अस्तित्वात असणारी कार्यपध्दतच सुरु ठेवावी व आवश्यकता असल्यास पुन्हा: हा प्रस्ताव ३ महिन्यानंतरच्या बैठकीमध्ये सादर करावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.१२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक नियोजन व अंमलबजावणीसाठी कामाचा आढावा.**

प्रस्तुत कार्यक्रम बाबीमध्ये सादर करण्यात आलेली माहिती ही सदस्यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शन मागणेसाठी असल्याने या प्रकरणी चर्चा करण्यासाठी एका वेगळ्या बैठकीचे आयोजन केल्यास योग्य ठरेल असा प्रस्ताव चर्चेस आला व त्याची नोंद घेण्यात येवून तो मान्यही करण्यात आला. या प्रकरणी चर्चा करण्यासाठी लवकरच वेगळ्या बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले. कार्यक्रम बाबीतील माहितीची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१३:- नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांकरिता निधीची कमतरता.**

प्रस्तुत कार्यक्रम बाबीमध्ये सादर करण्यात आलेली माहिती ही सदस्यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शन मिळणेसाठी असल्याने या प्रकरणी चर्चा करण्यासाठी एका वेगळ्या बैठकीचे आयोजन केल्यास योग्य ठरेल असा प्रस्ताव चर्चेस आला व त्याची नोंद घेण्यात येवून तो मान्यही करण्यात आला. या प्रकरणी चर्चा करण्यासाठी लवकरच वेगळ्या बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.१४:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा योजनांसाठी भांडवली बाजारातून कर्जरोख्याव्दारे उभारलेला निधी व त्या अनुषंगाने होत असलेल्या कृतीचा अहवाल**

प्रस्तुत कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने साधकबाधक चर्चा करण्यात येवून प्रस्ताव मान्य करण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.१५:- बदलापूर,अंबरनाथ पाणी पुरवठा योजनांतर्गत देखभाल दुरुस्ती निधीतून जलशुध्दीकरण केंद्र, बुस्टर पंपींग स्टेशनमधील पंप्स् बदलणे व तत्सम कामे करणे.**

या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१६:- विलंब आकार दर थकीत विलंब आकाराबाबत.**

या प्रकरणी चर्चा करण्यात येवून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर व्हावा व शासनाकडून अशा प्रस्तावाचा सविस्तर अभ्यासात्मक आढावा घेवून त्यांना मान्यता देण्यात यावी असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१७:- भैरोबा पंपींग स्टेशन,पुणे, येथील १.३५ हेक्टर जागा म.जी.प्राधिकरणाकडून पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणेबाबत.**

प्रस्तुत प्रस्ताव मान्य करण्यात आला. तथापि, प्रस्तावित जागा पुणे महानगरपालिकेस वर्ग करण्यापोटी महानगरपालिकेने अदा करावयाच्या जागेचे अंदाजित मूल्य रु.१७०.२५ लक्ष प्रथम प्राप्त करुन घ्यावे असे ठरविण्यात आले.

यानंतर सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,या पदी नव्याने नियुक्ती झालेले श्री.रत्नाकर गायकवाड तसेच प्राधिकरणाकडे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी या पदी नव्याने नियुक्त झालेले श्री.अ.बा.सावंत,यांचे मा.मंत्री महोदयांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी या पदी पूर्वी कार्यरत असणारे श्री.सतिश बागल,यांना मा.मंत्री महोदयांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून निरोप देण्यात आला.

उपरोक्त चर्चेअंती सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपविण्यात आली.

दर्शन
मसा
ठी

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९० व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९० वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा. ना.श्री. आर.आर. पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९ मार्च,२००१ रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री,ग्रामविकास,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे,मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३. श्री.सुनिल तटकरे,राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
४. श्री.एस.प्रभाकरन, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
५. श्री.विश्वास धुमाळ,सचिव,उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई
६. श्री.सुरेश साळवी,सदस्य सचिव,म.जी.प्रा.,मुंबई

या व्यतिरिक्त खालील निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
२. श्री.स.रा.बागल,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३. श्री.शेखर गायकवाड,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
४. श्री.मिलिंद केळकर,अ.अ.(समन्वय),म.जी.प्रा.,मुंबई
५. श्री.जी.सी.शर्मा,अ.अ.,म.नि.सं.व सं.कक्ष,म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

प्राधिकरणाच्या संचालक मंडळामध्ये सदस्यांचा सहभाग व त्यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा याबाबतचे नेमके स्वरुप काय आहे याची कल्पना नवीन सदस्यांना दयावी हा मुद्या सचिव,उद्योग,उर्जा व कामगार विभाग,यांनी मांडला. हा मुद्या स्वीकृत करण्यात येवून याबाबतची माहिती त्यांना करुन देणे आवश्यक असल्याची नोंद घेण्यात आली.

यानंतर, बाटलीबंद पेयजल प्रकल्पाची उभारणी याबाबतची सद्यस्थिती काय आहे याची विचारणा मा. अध्यक्ष महोदयांनी केली असता, महाराष्ट्रात चार ठिकाणी बाटलीबंद पेयजल प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित असून, त्याचे प्राथमिक अहवाल एम.सी.ई.डी. कडून तयार करुन घ्यावयाच्या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळालेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे अशी माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबतचा अंतीम प्रस्ताव १५ दिवसांत सादर व्हावा अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी केल्या.

यानंतर प्रस्तावित कार्यक्रम बाबींवरील चर्चेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

......२.....

**कार्यक्रम बाब क्र.२:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व ८९ व्या सभेतील निर्णयांवर करण्यात आलेली कृती.**

या बाबतचे माहितीची नोंद घेणेत आली.

**कार्यक्रम बाब क्र.३:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सुधारित अंदाजपत्रक सन २०००-२००१ व अंदाजपत्रक २००१ -२००२**

या अनुषंगाने सदस्य सचिव यांनी असे स्पष्ट केले की, सन २००१-२००२ चे अंदाजपत्रक हे शासनाच्या अंदाजपत्रकातील तरतूदींवर अवलंबून असल्याने शासनाच्या अंदाजपत्रक प्रसिध्द झाल्यानंतर प्राधिकरणास कार्यवाही करावी लागते. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकीय तरतूदी या शासन अंदाजपत्रकाशी निगडीत असतात. प्रस्तावित तरतूदीबद्दल माहिती देवून चर्चा करण्यात आली.

प्रसंगानुरुप या कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना मा.राज्यमंत्री,नगर विकास, यांनी रोहा व पळस गांव या दोन पाणी पुरवठा योजनांच्या प्रगतीबाबत असमाधान व्यक्त केले. यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी या दोन्ही योजनांचा आढावा घेवून व अडचणींवर उपाययोजना करुन कामे मार्गी लागतील अशा पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट केले.

उपरोक्त चर्चेनंतर या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.४:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सन २००१-२००२ करिता सुधारित दर आकारण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येवून कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केल्यानुसार सन २००१-२००२ करिता सुधारित दर आकारण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.५:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सन २००१-२००२ करिता सुधारित दर आकारण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येवून कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केल्यानुसार सन २००१-२००२ करिता सुधारित दर आकारण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.६:- ग्रामीण पाणी पुरवठा व नागरी पाणी पुरवठा योजनांचा गरजेवर आधारित वार्षिक कृती कार्यक्रम २००१-२००२**

ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी सन २००१-२००२ या वर्षात सर्व मार्गाने उपलब्ध होवू शकणाऱ्या निधीचे सर्वसाधारणपणे गरजेवर आधारित नियोजन करण्यात आलेले असून दूषित पाणी पुरवठा होणारी गावे तसेच गेली ६-७ वर्षे सतत पाणी टंचाई असणारी गावे व ज्या गावांच्या योजनांवर ९०% पेक्षा जास्त खर्च झालेला आहे व

ज्यांचे स्त्रोत खात्रीचे आहेत अशा योजनांना प्राधान्य देवून सदर योजनांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले असून, त्याची सविस्तर माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आल्याचे सदस्य सचिव यांनी निदर्शनास आणून दिले.

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येवून हुडको ,नाबार्ड व एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थांकडून जास्तीत-जास्त कर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत . तसेच निधीचा स्त्रोत कसा वाढविता येईल याबाबत प्रयत्न करावेत अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

प्रादेशिक विभागनिहाय उपलब्ध निधीचे विभाजन या अनुषंगाने जी माहिती सादर करण्यांत आली आहे याबाबत अध्यक्ष महोदयांनी समाधान व्यक्त केले. सन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजना तसेच मलनि:सारण योजनेसाठी जो कृती कार्यक्रम प्रस्तावित आहे त्यास मान्यता प्रदान करणेचा प्रश्न प्रलंबित ठेवणेचे ठरले. मात्र सन २०००-२००१ मध्ये ज्या मार्गदर्शक निकषांवर अंमलबाजवणी सुरु आहे त्याच पध्दतीने ती सुरु ठेवावी. तसेच हुडकोकडून घ्यावयाच्या रु.५०० कोटी कर्जाच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली.

<u>**कार्यक्रम बाब क्र.७:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक नियोजन व अंमलबजावणीसाठी कामांचा आढावा.**</u>

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वेगवेगळया स्त्रोतांव्दारे सन २०००-२००१ या वर्षात प्राप्त झालेला निधी व खर्चाचे विवरण तसेच प्राधिकरणावर असणारे दायित्व याची सविस्तर माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले याची नोंद घेण्यात आली.

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्राधिकरणाची थकबाकी प्रलंबित आहे, या थकबाकीच्या वसुलीबाबत कठोरपणे उपाययोजना करावी असे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले.

विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जी थकबाकी प्रलंबित आहे यापैकी किमान १०० कोटी रुपये या वर्षी वसुल करण्यात येतील असे उद्दिष्ट सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दयावे अशाही सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या. याबाबत मध्यवर्ती कार्यालयाकडून विशेषत्वाने प्रयत्न व्हावेत असेही स्पष्ट करण्यात आले.

नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी नगरपालिका/महानगरपालिकांनी आयुर्विमा महामंडळाकडून वा इतर वित्तीय संस्थांकडून कर्जाची उभारणी केलेली नाही त्यांना कर्ज उभारणीसाठीचे प्रस्ताव त्वरित सादर करण्याच्या सूचना दयाव्यात व असे प्रस्ताव विहित वेळेत सादर कर्ज उभारणीस विलंब झाल्यास पाणी पुरवठा योजनांची कामे रखडतील याची स्पष्ट कल्पना नगरपरिषदांना दयावी. मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये प्राप्त निधीपेक्षा या योजनावर जास्तीचा खर्च करण्यात येणार नाही व असे केल्याने योजनेची कामे रेंगाळल्यास त्याची जबाबदारी नगरपालिकांवर राहील. ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दयावी अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

<u>**कार्यक्रम बाब क्र.८:- प्रगतीपथावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हुडकोकडून ब्लॉक –II अंतर्गत रु.५०० कोटीचे व नाबार्डकडून रु.२०० कोटीचे कर्ज उभारणीसाठी मंजूरी.**</u>

हुडको व नाबार्ड दोन वित्तीय संस्थांकडून जी कर्जाची उभारणी करावयाची आहे त्याची माहिती या कार्यक्रम

......४...

बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आली होती. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येवून प्रस्तावास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि, या कर्ज प्रस्तावामध्ये ज्या योजनांचा समावेश करण्यात आला आहे. ती यादी अध्यक्षांच्या मान्यतेने अंतीम होईल.

**कार्यक्रम बाब क्र.९:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब.**

निविदा समितीने निविदा स्वीकृतीबाबत वेळोवेळी जे निर्णय घेतलेले आहेत त्याची माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आली होती. याबाबत साधकबाधक चर्चा करण्यात येवून स्वीकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. मात्र धरणगांव पाणी पुरवठा योजनेच्या निविदेबाबत आढावा घेवून कार्यवाही करावी अशाही सूचना देण्यात आल्या.

**कार्यक्रम बाब क्र.१०:- सन २०००-२००१ मध्ये ३३ चालू व ९ नवीन आणि १ सुधारित नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेसाठी आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणे(अनुसमर्थनासाठी)**

या कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येवून प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.११:- नागरी भागाकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना हुडकोकडून कर्ज उभारणेबाबत कर्ज रु.१२७५.३१ लाख व अनदान रु.१७७५.५७ लाख**

या कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येवून प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१२:- नागरी भागाकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना,वैयक्तिक/सार्वजनिक शौचकुप बांधकाम कार्यक्रमाकरीता हुडकोकडून रु.३००.७७ लाख कर्ज उभारण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्तावित करण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येवून प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

अन्य कार्यक्रम बाबी वेळेअभावी पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपविण्यात आली.